| | | |
|---|---|---|
| 3 | योजना व उपक्रम | सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियिम, १९७७ अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील योजना सुरु आहेत.<br><br>महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति कुटुंब १०० दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.<br><br>महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारीत कलम (१२) (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.<br><br>जवाहर / धडक सिंचन विहिर योजना<br><br>रोहयोंतर्गत फळबाग लागवड योजना.<br><br>याशिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बार्बीकरिता वापरला जातो<br>1. राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण (कुशल) कामे पुर्ण करण्याकरिता.<br>2. राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता. |
| 4 | योजने अंतर्गत अनुज्ञेय कामे | प्रवर्ग अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे<br>१. पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यांसारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जल संधारणाची व जल संचयाची बांधकामे;<br>२. व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबोध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जलव्यवस्थापनाविषयक कामे;<br>३. सूक्ष्म व लघू पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे;<br>४. सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नुतनीकरण करणे;<br>५. परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्टया, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्ष लागवड आणि फलोत्पादन;<br>६. सामुहिक जमितीवरील भूविकासाची कामे. |

| | | |
|---|---|---|
| | | **प्रवर्ग ब : दुर्बल घटकाकरीता व्यक्तीगत मत्ता (फक्त परिच्छेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबाकरिता)**<br>१. भूविकासामार्फत तसेच खोदविहिरी, शेत तळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारुन परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे;<br>२. फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपमाळा व प्रक्षेत्र वनीकरण यांमार्फत उपजीविकेची साधने वाढवणे;<br>३. परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबांच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता त्या जमिनींचा विकास करणे;<br>४. इंदिरा आवास योजनेअंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक;<br>५. पशूधनाला चालना देण्याकरिता कुक्कुटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे; आणि<br>६. मत्सव्यवसायाला चालना देण्याकरिता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.<br><br>**प्रवर्ग क : राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभीयान अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांकरिता सामाईक पायाभूत सुविधा**<br>१. जैविक खतांकरिता आवश्क असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारुन आणि कृषी उत्पादनांसाठी पक्क्या स्वरुपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारुन कृषी उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे; आणि<br>२. स्वयं-सहाय्यता गटांच्या उपजीविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष.<br><br>**प्रवर्ग ड : ग्रामीण पायाभूत सुविधा**<br>१. "हगणदारीमुक्त" गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालय, शाळेतील प्रसाधन गृहे, अंगणवाडी-प्रसाधनगृहे आणि विहित मानकांनुसार घनकचरा व सांडपाणी यांसारखी ग्रामीण स्वच्छतेसंबंधातील कामे.<br>२. रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणी आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्यांच्या जाळयाशी जोडणे; आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यांसहअंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ३. खेळाची मैदाने उभारणे.<br>४. ग्राम व गट स्तरावर पूर नियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिध्दता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुन:स्थापन करणे, सखल भागात जलनि:स्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पुराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडूजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे.<br>५. ग्राम व गट स्तरावर ग्राम पंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रें, गाव बाजार व स्मशानभूमी इत्यादींकरिता इमारती बांधणे.<br>६. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे.<br>७. अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे.<br>८. अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परीरक्षण करणे.<br>९. राज्य शासन या संदर्भात अधिसूचित करील अशी इतर कोणतीही कामे; आणि<br><br>१०. केंद्र सरकार राज्य शासनाशी विचारविनिमय करुन अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.<br>▪ प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधनसंपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद ८ च्या तरतुदींनुसार, ग्राम सभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राथम्यक्रम निर्धारित करील.<br>▪ गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यांसारखी अमूर्त स्वरुपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्धवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत. |
| 5 | वैयक्तिक लाभाच्या पात्रता | लाभार्थी पात्रता<br>• अनुसूचित जाती<br>• अनुसूचित जमाती<br>• दारिद्रय रेषेखालील लाभार्थी<br>• भुसूधार योजनेचे लाभार्थी<br>• इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी<br>• कृषी कर्जमाफी योजना 2008 नुसार अल्पभूधारक व सिमांत शेतकरी<br>• अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम 2006 नुसार पात्र व्यक्ती |

| | | |
|---|---|---|
| 6 | मजूरांच्या सोयी व सवलती | गावापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर रोजगार दिल्यास १० टक्के जास्त मजुरी राज्यशासनामार्फत अकुशल रोजगार 15 दिवसात उपलब्ध न केल्यास दैनिक मजुरीच्या २५ टक्के बेरोजगार भत्ता.<br>• कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार व बरोबर आणलेल्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय.<br>• कामाच्या अनुषंगाने मजुरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्केपर्यंत रक्कम सानुग्रह रुग्ण भत्ता. अपंगत्व वा मृत्यू आल्यास रुपये ५०,००० पर्यंन्त सानुग्रह अनुदान.<br>• कुटुंब नियोजनाकरिता सवलती. |
| 7 | योजने अंतर्गत जबाबदा-या | प्रमुख जबाबदारी  पंचायत राज संस्थांची ( त्यात जिल्हा परिषद, समिती, ग्राम पंचायत व ग्रामसभा )<br>ग्रामपंचायतीच्या जबाबदा-या :<br>• कुटुंबाची नोंदणी<br>• रोजगार उपलब्ध करणे<br>• ग्रामसभेच्या माध्यमातून रोजगाराच्या गरजेचा पूर्व वार्षिक अंदाज घेणे, त्याचप्रमाणे नियोजन आराखडा व कामाचे प्राधान्य ठरविणे.<br>• सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता.<br>• दक्षता समिती<br>• रोजगार दिवस<br>पंचायत समितीच्या जबाबदा-या<br>• समिती क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीचे समन्वयन, सनियंत्रण व कामाचे नियोजन<br>जिल्हा परिषदेच्या जबाबदा-या<br>• जिल्हयातील सर्व पंचायत समिती क्षेत्रनिहाय वार्षिक मजूर अंदाज व कामाचे नियोजन<br>• सनियंत्रण, समन्वयन. |

| | | |
|---|---|---|
| 8 | पंचायतराज संस्थाना त्यांची कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास मदत करणारे अधिकारी | जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) योजनेचे जिल्हा प्रमुख, सनियंत्रण,नियोजन,निधीवाटप,प्रशासकीय मान्यता,तपासणी,माहिती समन्वयक<br>सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद)<br>• जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत<br>• नियोजन<br>• निधी<br>• प्रशासकीय मान्यता<br>• तपासणी<br>तालुका कार्यक्रम अधिकारी (तहसीलदार)<br>• प्रशासकीय मान्यता<br>• तहसीलमधी नियोजन<br>• समन्वय<br>• वेळेवर मजुरी वाटप<br>• सामाजिक अंकेक्षण<br>• तक्रार निवारण<br>• जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या जबाबदा-या पार पाडण्यास ते सूचित करतील. त्याचप्रमाणे कार्य करणे.<br>तालुका सहकार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी)<br>• प्रशासकीय मान्यता<br>• पंचायत समिती क्षेत्रातील मग्रारोहयो संदर्भात सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकास त्यांच्या जबाबदा-या पार पाडण्यास ते सूचित करतील त्याप्रमाणे कार्य करणे.<br>• कार्यक्रम अधिका-यास मदत<br>कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचे अधिकारी<br>जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदा-या पार पाडण्याकरिता मदत.<br>ग्रामसेवक<br>• ग्रामपंचायतीच्या जबाबदा-या पार पाडणे<br>• निधी<br>• अभिलेख<br>ग्राम रोजगार सेवक<br>• ग्रामपंचायतीला मदतनीस |

| | | |
|---|---|---|
| 9 | वार्षिक कामांचा आराखडा | ग्रामपंचायतीने ग्रामसेभेच्या माध्यमातून प्रत्येक गावाच्या वार्षिक अकुशल रोजगाराच्या गरजेचा अंदाज बांधणे.<br>• शासनाने तयार केलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना  महाराष्ट्र आराखडयातील कामांची निवड, प्राध्यानता लक्षात घेऊन ग्राम पंचायतीने करणे.<br>• ऑक्टोबर व डिसेंबर या काळात पुढील वर्षात घ्यावयाच्या कामांना तांत्रिाक मान्यता, जिल्हा परिषदेची मान्यता इ. विहीत कार्यपध्दतीचे पालन करणे.<br>• जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी जिल्हा परिषदेची संपूर्ण जिल्हयाच्या आराखडयास व नियोजनास मंजुरी प्राप्त करुन घेणे व मंजूर आराखडयातील कामांना विशिष्ट क्रमांक देणे.<br>• वार्षिक आराखडयाचे वेळापत्रक पुढील वर्षात घ्यावयाच्या कामांची शिफारस १५ ऑगस्टच्या ग्रामसेभेत घेणे<br>• ग्रामसभेच्या शिफारशीप्रमाणे ग्रापंचायत कामाचा प्राधान्यक्रम निश्चित करेल<br>• पंचायत समिती ग्राम पंचायतीकडून आलेले आराखडे नोव्हेंबर अखेरपर्यंत अंतिम करतील<br>• जिल्हा कार्यक्रम अधिकारी देखील कामांची शिफारस करेल व जिल्हा परिषदेकडे देईल.<br>• पंचायत समितीने व जिल्हा कार्यक्रम अधिका-याने शिफारस केल्याप्रमाणे जिल्हा परिषद दरवर्षी डिसेंबरमध्ये जिल्हयाचा पुढील वार्षिक मजूर आराखडा मंजूर करेल.<br>• डिसेंबर अखेर राज्यशासनास सर्व जिल्हयांचे पुढील वर्षाचे मजूर आराखडे प्राप्त करणे.<br>• राज्य शासन जानेवारी महिन्यात राज्याचा जिल्हावार मजूर वार्षिक आराखडा केंद्रशासनास सादर करेल. |

| | | |
|---|---|---|
| 10 | लेबर बजेट संकल्पना | योजने अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात येणा-या सर्व कामांचा वार्षिक कृती आराखडा<br>• कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्यावर ग्रामीण पंचायतीचे लेबर बजेट तयार करुन घेण्याची जबाबदारी आहे.<br>• लेबर बजेट सोप्या पध्दतीने पुढीलप्रमाणे :<br>o ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये काम करण्यास इच्छुक असलेल्या सरासरी कुटुंबाची संख्या X सरासरी दिवस X मजुरी दर (जसे सरासरी ५० कुटुंबे X २० दिवस X संबंधित वर्षाचा मजूरी दर<br>लेबर बजेट करिता व अनपेक्षित वाढीसाठी कामाचा पुरेसा शेल्फ तयार असावा.<br>केंद्र शासनाकडून वितरित होणारा निधी हा लेबर बजेटवर अवलंबून आहे. |
| 11 | कामांची मंजूरी व कार्यान्वयन | प्रस्तावित वा मंजूर आराखडयातील कामांची अंदाजपत्रके यंत्रणा वा ग्रामपंचायतीकडून जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने तयार करुन घेणे.<br>• अंदाजपत्रकास सक्षम तांत्रिक अधिका-याने मंजूरी देणे.<br>• अंदाजपत्रकानुसार ज्या कामात साहित्य, कुशल, अर्धकुशल मजूरी यांचा खर्च ४० टक्क्याहून (साहित्य, साधनसामुग्री इ.) अधिक नसावा.<br>• अकुशल मजूरीचा भाग किमान ६० टक्के असावा.<br>• कार्यक्रम अधिका-याने आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांना काम सुरु करण्याचे आदेश दयावेत.<br>• ते देताना वार्षिक आराखडयाच्या किंमतीच्या किमान ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायतीमार्फत कार्यान्वित करण्याची कायदयात तरतूद.<br>• नवीन काम सुरु करण्यास किमान १० मजूर आवश्यक, सदर अट डोंगराळ व वनीकरणाच्या कामास शिथिल.<br>• यंत्रणेने विहीत हजेरीपट ठेवणे.<br>• झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन दरपत्रकाप्रमाणे मजुरी हिशोबित करुन हजेरीपट संपल्याच्या दिनांकापासून जास्तीतजास्त १५ दिवसांच्या आत मजूरी पोस्ट वा बँकेत मजुराच्या खात्यावर जमा करणे.<br>• कुशल कामे खात्यामार्फत करणे<br>• कामावर कंत्राटदार न नेमणे<br>• मजुरांमार्फत करता येण-या कामांकरिता यंत्राचा वापर न करणे<br>• कामासंदर्भात सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायतीमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध करणे<br>• कामाच्या अकुशल भागाबाबत आदेशानुसार मजुरीवरील खर्च एकूण खर्चाच्या ६० टक्के प्रमाणात ठेवावा. ४० टक्के कुशल खर्चामध्ये साहित्य सामुग्री, अर्धकुशल-कुशल मजुरी यांचा समावेश आहे. |

<table>
<tr><td rowspan="5">12</td><td rowspan="5">कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता</td><td>अ.क्र.</td><td>यंत्रणा</td><td>तांत्रिक मान्यता</td><td>प्रशासकीय मान्यता</td></tr>
<tr><td>अ.</td><td>रुपये २५ लाखापर्यंत प्रत्येक कामाची किंमत (ग्रामपंचायत/ पंचायत समिती)</td><td>पंचायत समिती स्तरावरील संबंधित तांत्रिक अधिकारी</td><td>सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी)</td></tr>
<tr><td></td><td>शासकीय</td><td>तालुका स्तरावरील शासकीय यंत्रणा तांत्रिक आधिकारी</td><td>कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) / कार्यान्वयन यंत्रणा</td></tr>
<tr><td>ब.</td><td>रुपये २५ लाखांपेक्षा अधिकाच्या प्रत्येक कामाची किंमत (ग्रामपंचायत/ पंचायत समिती)</td><td>जिल्हा स्तरारावरील परिषदेचे तांत्रिक अधिकारी</td><td>सहकार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.)</td></tr>
<tr><td></td><td>शासकीय</td><td>जिल्हा स्तरावरील शासकीय यंत्रणा तांत्रिक आधिकारी</td><td>जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाअधिकारी)</td></tr>
<tr><td>13</td><td>कार्यान्वयीन यंत्रणा</td><td colspan="4">ग्रामपंचायत वार्षिक आराखडयातील किमान ५० टक्के खर्चाची कामे<br>• ग्रामपंचायत<br>• शासकीय विभाग<br><br>निधी<br>१०० दिवसाच्या हमीपोटी १०० टक्के मजुराचा खर्च भारत सरकार<br>• ७५ टक्के साहित्य व कुशलचा खर्च भारत सरकार<br>• २५ टक्के साहित्य व कुशलचा खर्च राज्य शासन<br>• ६ टक्के कामाच्या एकूण (मजुरी व कुशल) खर्चाच्या प्रशासकीय खर्च भारत सरकार<br>• सर्व लेखांची तपासणी सनदी लेखापालाकडून.</td></tr>
<tr><td>14</td><td>कामांचे गुण नियंत्रण व दक्षता</td><td colspan="4">स्वत:हून माहिती जाहीर करणे<br>१. दक्षता समिती.<br>२. दक्षता पथकाकडून तपासण्या.<br>३. नियमित तपासण्या व पाहणी.<br>४. विभागीय आयुक्तांमार्फत पर्यवेक्षण, समन्वय, सनियंत्रण.<br>५. Ombudsmanची नियुक्ती<br>६. सामाजिक अंकेक्षण<br>७. पारदर्शकता<br>८. कामांची व इतर माहितीसह माहिती पत्रके<br>९. सर्व कागदपत्रे व्हाउचरसह सामाजिक अंकेषणासाठी जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध.</td></tr>
</table>